**प्रेसनोट**

**अंमली पदार्थ विरोधी कक्ष, आझाद मैदान युनिट यांनी १२५ ग्रॅम ''एम.डी (मेफेड्रॉन) या अंमली पदार्थासह डोंगरी व नागपाडा परीसरातील ०३ इसमांना अटक केलेबाबत.**

| | |
|---|---|
| कक्ष | अंमली पदार्थ विरोधी कक्ष, आझाद मैदान युनिट, गु.शा.गु.अ.वि. मुंबई |
| गु.र.क्र. व कलम | १५९/२०२२ कलम ८ (क)सह २०(क), २० (ब), २९ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ |
| गुन्हा दाखल दिनांक | दि. २३/०७/२०२२ रोजी ०७.०५ वा. |
| गुन्हा घडला दि. व वेळ | दिनांक २३/०७/२०२२ रोजी ०१.३५ वाजता ते ०५.०० वाजता चे दरम्यान. |
| घटनास्थळ | बेगमोहमद चाळ,जे जे हॉस्पिटल रोड, डोंगरी मुंबई |
| फिर्यादीचे नाव | पो.ह.क्र. ९६०३६८/संतोष जिजाबा दोरगे. |
| आरोपीची संख्या | ०३ |
| जप्त मुददेमाल व अंदाजे किंमत | आ.क्र. ०१ याचेकडुन १५ ग्रॅम वजनाचा एम.डी (मेफेड्रॉन) जप्त<br>आ.क्र. ०२ याचेकडुन २० ग्रॅम वजनाचा एम.डी (मेफेड्रॉन) जप्त<br>आ.क्र. ०३ याचेकडुन ९० ग्रॅम वजनाचा एम.डी. (मेफेड्रॉन) जप्त<br>**(एकूण १२५ ग्रॅम वजनाचा एम.डी मेफेड्रॉन (अंदाजेकिंमत रू. १८,७५,०००/-)** |

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :-अंमली पदार्थ विरोधी कक्ष आझाद मैदान युनिटचे प्रभारी पोलीस निरीक्षक राजेंद्र दहिफळे व पथक दिनांक २३/०७/२०२२ रोजी दक्षिण प्रादेशिक विभागाअंतर्गत गस्त करीत असताना बेगमोहमद चाळ,जे जे हॉस्पिटल रोड, डोंगरी मुंबई येथे अटक आरोपी ०१ व २ यांची संशयास्पद हालचालीवरून झडती घेतली असता त्यांचेकडुन अनुक्रमे १५ ग्रॅम एम.डी व २० ग्रॅम एम.डी (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला.

ताब्यात घेतलेल्या वरील दोन्ही आरोपींनी सदर अंमली पदार्थ कोणाकडुन घेतला याबाबत घटनास्थळीच सखोल तपास केला असता अटक आरोपी क्र. २ याने आरोपी क्र. ३ याचेकडुन सदर अंमली पदार्थ घेतलेबाबत माहिती दिली. तात्काळ आरोपी क्र. ३ यास ताब्यात घेवुन त्याची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्याने विक्री करण्याचे उददेशाने स्वत:चे ताब्यात बाळगलेला एकुण ९० ग्रॅम वजनाचा एम.डी. (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे.

**अटक इसमांची नावे :-**

१) इम्रान अब्दुलअजीज खान उर्फ इम्रान जे.जे वय ४२ वर्षे रा. डोंगरी, मुंबई
२) अब्दल अजीम करीम साठी उर्फ अजीम बावा वय ३५ वर्षे रा. डोंगरी, मुंबई.
३) नदीम सलीम सोरटीया उर्फ नदीम बाटला वय ३४ वर्षे रा.नागपाडा मुंबई.

अशा प्रकारे डोंगरी, नागपाडा, मुंबई परिसरात छुप्या पध्दतीने कार्यरत असणारी अंमली पदार्थ विक्रेत्यांची पुर्ण टोळी अटक करण्यात अंमली पदार्थ विरोधी कक्षाला यश आले आहे. या टोळीतील इतर सदस्यांचा शोध घेऊन अंमली पदार्थ पुरवठादाराची पुढील साखळी उघड करण्याचा प्रयत्न मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली करीत आहोत.

सदर कारवाई मा.पोलीस सह आयुक्त (गुन्हे),श्री.डॉ.सुहास वारके सो, मा.अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री विरेश प्रभु सो, मा. पोलीस उप आयुक्त,श्री.दत्ता नलावडे सो व मा. सहा. पोलीस आयुक्त,श्री. सावळाराम आगवणे सो अंमली पदार्थ विरोधी कक्ष, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र दहिफळे यांचे नेतृत्वाखाली पो.उ.नि. अशोक तपासे, पो.ह.क्र. ९६०३६८/दोरगे, पो.ह.क्र. ९७०७२६/पाटील, पो.ना.क्र.०५०२११/चव्हाण, पो.शि.क्र.०८०७१२/भुजबळ, ०८०२३७/इघे, पो.शि.क्र ०९०२६१/देशमुख, पो.ना.चा.क्र. ०७१६१०/राठोड, पो.शि.चा.क्र.०७०२०७/निंबाळकर यांनी पार पाडली असुन गुन्हयाचा पुढील तपास मा. वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली पो.उ.नि. अशोक तपासे हे करीत आहेत.